# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.05.2025** **वार- सोमवार**

---

**अमृतभारत**

केंद्र सरकारच्या अमृत भारत योजने अंतर्गत पुणे जिल्ह्यातील लोणंद आणि केडगाव रेल्वे स्थानकांचा विकास करण्यात येत आहे. या रेल्वे स्थानकांचं उद्घाटन येत्या 22 मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने होणार आहे. लोणंद रेल्वे स्थानकाच्या विकासासाठी पहिल्या टप्प्यात केंद्र सरकारने आत्तापर्यंत दहा कोटी 48 लाख रुपये मंजूर केले आहेत. तर केडगाव रेल्वे स्थानकासाठी पहिल्या टप्प्यात 12 कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत. या रेल्वे स्थानकांमध्ये नवीन प्रवेशद्वार, शौचालय सुविधांचं नूतनीकरण आणि दिव्यांगजनांसाठी विविध सुविधा उभारण्यात आल्या आहेत, अशी माहिती मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी हेमंत कुमार बेहरा यांनी दिली आहे.

**रामदासआठवले**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीने एकत्रित लढवाव्यात, अशी आपल्या पक्षाची भूमिका असल्याचं रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. पुणे महापालिका निवडणुकीत किमान १५ प्रभागात आपल्या पक्षाला उमेदवारी मिळावी. संपूर्ण पाच वर्षांसाठी पक्षाला उपमहापौरपद मिळावं आणि मागास प्रवर्गाचं आरक्षण आल्यास महापौरपद मिळावं अशा आपल्या मागण्या आहेत, असं आठवले

म्हणाले. या मागण्यांसदर्भात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याशी आपली चर्चा झाली आहे. आगामी काळात विविध महामंडळे, जिल्हा नियोजन मंडळावरील नियुक्त्यामध्येही पक्षाला योग्य प्रतिनिधित्व मिळावं, अशी आमची मागणी आहे, असं आठवले म्हणाले.

**<u>अहिल्यादेवीहोळकर</u>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची 300 वी जयंती 31 मे रोजी साजरी होत आहे. त्या निमित्तानं राज्यात विविध ठिकाणी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहरात 24 मे ते 31 मे या कालावधीत सात ठिकाणी कार्यक्रम होणार आहेत. 24 मे रोजी शहरात मिरवणूक काढण्यात येईल. तसंच शालेय विद्यार्थ्यांसाठी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर आधारित वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात येतील. याशिवाय विविध शैक्षणिक संस्थांमध्ये परिसंवाद आणि मार्गदर्शनपर व्याख्यानाचंही आयोजन करण्यात येणार आहे.

**<u>ससूनरुग्णालय</u>**

गेल्या वर्षी झालेल्या कल्याणी नगर अपघात प्रकरणात रक्त नमुन्यांची अदलाबदली केल्याचं समोर आल्यानंतर ससून रुग्णालयातील आपत्कालीन कक्षात फेरबदल करण्यात आल्याची माहिती रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. येलप्पा जाधव यांनी दिली आहे. रक्ताचे नमुने घेताना पारदर्शकता राहावी यासाठी तिथे 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांची संख्या वाढवली असून न्यायालयीन प्रकरणांवर म्हणजे एमएलसीवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. डॉक्टरांच्या कामाच्या वेळा देखील बदलण्यात आल्या आहेत. ससूनच्या आपत्कालीन कक्षात 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांची संख्या वाढवून १६ केली आहे असंही जाधव यांनी सांगितलं.

**पदव्युत्तरअभ्यासक्रम**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एकात्मिक आणि आंतरविद्याशाखीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्यासाठी उद्या म्हणजेच 20 मे हा शेवटचा दिवस आहे. यासाठी 3 ते 5 जून दरम्यान ऑनलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा होणार असल्याचं विद्यापीठानं कळवलं आहे.

Pcmc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ लगत असणाऱ्या सेवा रस्त्यांच्या विकासाबाबत महानगरपालिका आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त आढावा बैठक आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत नुकतीच झाली. हा रस्ता विकसित करताना अडथळा ठरणारे सर्व जाहिरात फलक, अनधिकृत टपऱ्या, बांधकामं त्वरित हटवण्याचे आदेश आयुक्त सिंह यांनी दिले आहेत.

**केळकरसंग्रहालय**

जागतिक संग्रहालय दिनाच्या निमित्ताने पुण्यातल्या राजा दिनकर केळकर संग्रहालयात स्मार्ट डिजिटल ऑडिओ गाईड सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संग्रहालयाच्या विविध दालनांमध्ये असणाऱ्या दुर्मिळ वस्तूंची माहिती पर्यटकांना मराठी , हिंदी आणि इंग्रजी भाषेमध्ये डिजिटल ऑडिओ गाईडच्या माध्यमातून मिळणार आहे. पर्सिस्टंट फाउंडेशनच्या साह्याने ही स्मार्ट डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**जलतरण**

पुणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या वतीने रमेश दमले स्मृती जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये 14 वर्षांखालील गटात ईशान तिडके आणि 19 वर्षाखालील गटात झील मलानी आणि

साराक्षी दांगट यांनी आपापल्या गटात दुहेरी मुकुट मिळवला. बारा वर्षाखालील गटात अनिशा काळे आणि वेद नातू यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर वातावरण ढगाळ झालं आहे. आज कमाल तापमान 34 तर किमान तापमान 23 पूर्णांक 3 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या सोसाट्याच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह , नमस्कार.**